महासागर

# साहित्य मैफल

रविवार, दिनांक २१ डिसेंबर २०२५

**भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्राने आपला लवचिकपणा सिद्ध केला आहे. एप्रिल–सप्टेंबर २०२५ दरम्यान देशाची वस्त्रोद्योग, तयार कपडे आणि हस्तकला उत्पादनांची निर्यात मागील वर्षाच्या तुलनेत ०.१ टक्क्यांची महत्त्वपूर्ण वाढ दर्शवते. अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत घट झाली तरी, इतर देशांमधील मजबूत कामगिरीमुळे त्याचा परिणाम कमी होण्यास मदत झाली. त्यातून या क्षेत्राच्या वैविध्यपूर्ण बाजारपेठेचे सामर्थ्य अधोरेखित होते.**

# वस्त्रोद्योगाच्या बाजारपेठेत वेगवान हालचाली

परामर्श

**हेमंत देसाई,** ज्येष्ठ पत्रकार

वस्त्रोद्योग मंत्रालय निर्यातदारांशी, विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांशी संपर्कात राहिले आहे. जेणेकरून शुल्काशी संबंधित आव्हाने समजून घेता येतील आणि भारताची स्पर्धात्मकता जपली जाईल. या बाह्य दबावांदरम्यान, स्थिरता आणि वाढीचा एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून तामिळनाडू उदयास आले. देशातील सर्वात महत्त्वाचे वस्त्रोद्योग निर्यातदार राज्य म्हणून तामिळनाडूने निर्यातीमध्ये २.६ टक्क्यांनी वाढ नोंदवली आहे. एप्रिल–सप्टेंबर २०२४ मधील ३,९७५.०४ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सवरून याच कालावधीत यंदा ती ४,०७८.०६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे. राज्यातील तिरुपूर, करूर, इरोड, कोईम्बतूर आणि सेलम यासारख्या चैतन्यपूर्ण वस्त्रोद्योग केंद्रांनी एकत्रितपणे ११.४ टक्क्यांची प्रभावी निर्यात वाढ साध्य केली आहे. भारताचे अग्रगण्य निटवेअर केंद्र असलेल्या तिरुपूरला सरकारने दिलेल्या तात्पुरत्या आयात शुल्कमाफीचा विशेष फायदा झाला. त्यामुळे कच्च्या मालाच्या किमतींवरील दबाव कमी झाला. 'पीएम मित्र पार्क'च्या विकासामुळे आधुनिक, एकात्मिक उत्पादन परिसंस्था तयार होत आहेत, तर एमएमएफ वस्त्रोद्योग आणि तांत्रिक वस्त्रोद्योगांसाठीच्या उत्पादन–संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजनेतील सुधारणांमुळे पात्र उत्पादनांची व्याप्ती वाढली असून अनुपालन प्रक्रिया सुलभ झाली आहे. त्यामुळे जलद गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळत आहे. दरम्यान, राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग अभियान नावीन्यपूर्णता आणि उच्च–मूल्याच्या संशोधन व विकासाला चालना देत आहे. त्यामुळे भारताला पुढील पिढीच्या वस्त्रोद्योग श्रेणींमध्ये आघाडी मिळत आहे. खर्च कपातीच्या उपायांनीही यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कापसावरील आयात शुल्कातून मिळालेल्या सवलतीमुळे तामिळनाडूसारख्या कापूस–केंद्रित क्लस्टर्ससाठी, उत्पादन खर्चावरील दबाव कमी झाला आहे. वस्त्रोद्योग मूल्य साखळीतील जीएसटीच्या सुसूत्रीकरणामुळे रोख प्रवाहामध्ये सुधारणा झाली आहे आणि संरचनात्मक अकार्यक्षमता कमी झाली आहे. त्यामुळे उत्पादकांना स्पर्धात्मक राहण्यासाठी वाव मिळाला आहे. सवलती आणि प्रोत्साहनांव्यतिरिक्त भारत पारंपरिक प्रदेशांवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने ४० देशांच्या विविधीकरण धोरणाद्वारे आपली बाजारपेठेतील पोहोच वाढवत आहे. निर्यातदार, विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना निर्यातदारांसाठी असलेल्या क्रेडिट गॅरंटी योजनेचा अधिक फायदा होत आहे, जी वीस हजार कोटी रुपयांपर्यंतच्या अतिरिक्त कर्जासाठी शंभर टक्के संरक्षण प्रदान करते. गुंतागुंतीची जागतिक परिस्थिती असूनही भारताचे वस्त्रोद्योग क्षेत्र २०२५–२६ या आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात स्थिर वाढीसह प्रवेश करत आहे. त्याला सक्रिय धोरणात्मक पाठिंबा आणि प्रमुख उत्पादन क्लस्टर्सच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे बळकटी मिळाली आहे. तामिळनाडूची मजबूत दोन अंकी क्लस्टर वाढ या क्षेत्राची चपळता आणि अनुकूलतेचा पुरावा आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर भारत एक विश्वसनीय आणि स्पर्धात्मक पुरवठादार म्हणून आपली स्थिती मजबूत करत आहे. भारताची वस्त्रोद्योगाची गाथा लवचिकता, धोरणात्मक कृती आणि नूतनीकरण केलेल्या आत्मविश्वासाची आहे, जी आगामी वर्षांमध्ये अधिक मजबूत स्पर्धात्मकता आणि जागतिक नेतृत्वासाठी पाया तयार करत आहे.

भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत ९० रुपयाच्या पुढे गेल्यामुळे बाजारपेठेत चिंता निर्माण झाली आहे. मात्र भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा 'चिंता की कोई बात नहीं' अशा पवित्र्यात आहेत. व्यापार आणि पोर्टफोलिओ गुंतवणुकीमधील





मंदी आणि भारत–अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापारी करार रेंगाळल्यामुळे, आपल्या चलनावर सध्या दबाव निर्माण झाला आहे. डॉलर हे जगातील सर्वात प्रभावशाली आणि महत्त्वपूर्ण असे चलन आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारात त्याचेच मोल आहे. परदेशातून आपण पेट्रोल, खते, सोने, इलेक्ट्रॉनिक्स आणि यंत्रसामग्रीचे भाग मोठ्या प्रमाणावर आयात करतो. त्याचप्रमाणे कच्चे तेल, खाद्य तेल आणि डाळी यांची प्रचंड प्रमाणात आयात केली जाते. डॉलर तेजीत गेल्यामुळे या सर्व वस्तू महागल्या आहेत. वस्तूंच्या किमतीत भर पडत आहे आणि यापुढेही काही महिने तरी तशीच स्थिती राहणार आहे. परदेशी शिक्षण, प्रवास आता अधिक खर्चिक बनला आहे. कॉंप्युटर, लॅपटॉप यांच्या किमती वाढणार आहेत. परंतु प्रमुख जागतिक चलनांच्या तुलनेत रुपयाची घसरण अर्थव्यवस्थेसाठी चांगली आहे, असे नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष राजीवकुमार यांनी म्हटले आहे. यामुळे भारतातील रोजगारकेंद्रित निर्यातीला प्रोत्साहनच मिळणार आहे. रुपया आपला मार्ग स्वतःच तयार करेल. रुपयाबाबत होणारी चर्चा जुन्या परिस्थितीनुसार न पाहता, सध्याच्या आर्थिक वास्तवाच्या आधारावर पाहिली पाहिजे, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे. देशाची अर्थव्यवस्था समर्थ असते आणि विकासदर वेगवान असतो, तेव्हा रुपया–डॉलर विनिमयदराचा अन्वयार्थ त्या संदर्भात लावला पाहिजे, यावर अर्थमंत्र्यांचा भर आहे.

रुपया कमकुवत होतो, तेव्हा सामान्यतः निर्यातदारांना त्याचा फायदा होतो. अशा वेळी अमेरिकेने अनेक आयातवस्तूंवर शुल्क लावले असताना केवळ याच एकमेव कारणामुळे रुपयाची घसरगुंडी फायद्याच्या स्वरूपात मांडणे, हा तर्कदेखील योग्य नव्हे, असेही अर्थमंत्र्यांचे मत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या ठोकळ राष्ट्रीय उत्पादनाची, म्हणजेच जीडीपीची वाढ दुसऱ्या तिमाहीमध्ये ८.२ टक्क्यांवर पोहोचली असून ऑक्टोबर २०२५ मध्ये किरकोळ महागाई दर पाव टक्क्यांवर आला आहे. आज भारताची आर्थिक स्थिती अनेक मोठ्या देशांच्या तुलनेत बरी आहे, हे देखील खरे आहे. भारत– अमेरिका व्यापारी कराराच्या वाटाघाटी अंतिम टप्प्यात अद्याप पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे नेमके किती शुल्क लावले जाणार आहे, याबद्दल अनिश्चितता आहे. त्यामुळे येत्या उन्हाळ्यासाठी अपेक्षित ऑर्डर्स भारतीय परेल उत्पादकांना अद्याप मिळालेल्या नाहीत. या ऑर्डर्स अर्थातच बांगलादेश, व्हिएतनाम आणि चीनकडे जाऊ शकतात. कारण अमेरिकेने सध्या तरी भारतावर ५० टक्के शुल्क लावलेले आहे. या अन्य देशांवरील शुल्क मात्र भारताच्या तुलनेत कमी आहे. एकदा का भारतीय बाजारपेठेकडे अमेरिकेतील आयातदारांनी पाठ फिरवली, की तेथील तयार कपड्यांची बाजारपेठ भारताच्या हातातून कायमची जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारताने रशियाकडून तेलाची खरेदी घटवली असल्यामुळे उद्या अमेरिकेने २५ टक्के शुल्क उठवले, तरीदेखील भारताच्या दृष्टीने परिस्थिती थोडीफार अनुकूल होऊ शकेल. दुर्दैवाची गोष्ट अशी की, भारत–अमेरिका व्यापारी करार होणार आहे की नाही, हेही माहीत नसल्यामुळे भारतातील उत्पादक नेमके काय करावे या विवंचनेत आहेत. करार होणारच नसेल, तर ताबडतोब अमेरिकेकडचे लक्ष हटवून उत्पादक अन्य बाजारांकडे लक्ष केंद्रित करू शकतील.

२०२४ मध्ये भारताने अमेरिकेला १०.३ अब्ज डॉलरचे कपडे आणि कापडांची निर्यात केली होती. भारताच्या एकूण निर्यातीत कापड व कपड्यांचा वाटा आठ टक्के इतका आहे. कापड व कपडे यांचा ९० टक्के कच्चा माल हा भारतातूनच उपलब्ध होतो. भारतात तामिळनाडूतील तिरूपूर येथे तयार कपड्यांचे असंख्य कारखाने आहेत. परंतु तेथे सध्या फारशा ऑर्डर्स नसल्यामुळे दिवाळीच्या सुट्टीनिमित्त गावी गेलेले हजारो कामगार परत आलेलेच नाहीत. तिरुपूरमधील ४० टक्के माल हा अमेरिकेकडे रवाना केला जात असतो. तेथूनच अमेरिकेला वर्षाला १४ हजार कोटी रुपयांची निर्यात होते. त्यापैकी उन्हाळ्यातील कपड्यांची निर्यात ७००० कोटी रुपयांची असते. अमेरिकेच्या वाढीव शुल्कामुळे अमेरिकन बाजारपेठेतील भारतातील तयार कपड्यांच्या किमती जास्त आहेत. म्हणूनच अन्य देशांच्या इतक्याच किमती ठेवण्यासाठी सरकारने अनुदान द्यावे, अशी मागणी केली जात आहे.

भारताने आपली कापड निर्यात वाढवण्यासाठी ब्रिटन, जपान आणि दक्षिण कोरियासह ४० प्रमुख देशांशी बोलणी सुरू केली आहेत. या देशांची एकत्रित कापड आयात ५०९ अब्ज डॉलरची आहे. त्यामुळे अमेरिकेचे दरवाजे बंद झाल्यास, भारतीय निर्यातदारांसाठी नवीन दरवाजे खुले होऊ शकतात. सध्या या पर्यायी बाजारपेठेत भारताचा वाटा फक्त पाच ते सहा टक्के आहे. तो वाढवणे शक्य आहे. तयार कपड्यांची जागतिक बाजारपेठ सतत विस्तारत आहे. गेल्या वर्षी १.२ ट्रिलियन डॉलर किंमतीच्या कपड्यांची संपूर्ण जगात विक्री झाली. कपड्यांची फॅशन सतत बदलत असते. नायका आणि अदिदास हे ब्रँड्स जागतिक बाजारपेठेत आघाडीवर आहेत. चीनसारख्या कंपन्याही प्रभावी आहेत. त्याचप्रमाणे सेकंडहँड कपड्यांची बाजारपेठही प्रचंड आहे. ऑनलाइन विक्रीमुळे ग्राहकांना कपडे खरेदी करणे सोपे झाले आहे. स्वस्त आणि दर्जेदार नीटवेअर उत्पादनांसाठी बांगलादेश प्रसिद्ध आहे. सुती, रेशमी आणि हस्तकलेच्या वस्त्रांसाठी भारत प्रसिद्ध आहे. पाकिस्तान, तुर्कस्तान व्हिएतनाम आणि जर्मनी यांची निर्यातही लक्षणीय आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेशी आपला व्यापारी करार लवकरात लवकर झाल्यास भारतातील बाजारपेठेत तेजी परतु शकेल, हे ही खरेच.

✦✦✦

**बांगलादेशमध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणुका होऊन 'जुलै चार्टर'वर देशभरात जनमत चाचणी घेतली जाणार आहे. यामुळे युनूस सरकार निवडणुका आणि जनमत चाचणी एकाच वेळी का घेऊ इच्छिते, असा प्रश्न पडतो. युनूस सरकारचे निर्णय आणि राजकीय पक्षांची स्थिती पाहता बांगलादेशमध्ये लोकशाही नावालाच राहण्याची चिन्हे असून कारभार अध्यक्षांच्या हाती एकवटणार अशी चिन्हे आहेत.**

# बांगलादेश अराजकतेच्या वाटेवर

दृष्टीक्षेप

**जनार्दन पाटील**

बांगलादेशमध्ये सत्ता परिवर्तनानंतर शेख हसीना यांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत कट रचला जात असल्याची चर्चा सुरु होती. तथापि आता अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस शेख हसीना यांची सत्ता उलथवून टाकण्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न करत आहेत. बांगलादेशमधील निवडणुकीच्या ताज्या घोषणेकडे सरकार स्थापन करण्यापेक्षा बंडाला समर्थन देण्याची योजना म्हणून पाहिली जात आहे. हसीना यांचे सरकार उलथवून टाकण्याच्या घटनेला ५ ऑगस्ट २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर युनूस यांनी संकेत दिले होते, की निवडणुका फेब्रुवारी २०२६ मध्ये होतील. आता तारखा निश्चित झाल्या आहेत आणि त्याला एक मोठा राजकीय प्रयोग जोडला आहे, तो म्हणजे 'जुलै चार्टर'. त्यावर २५ हून अधिक पक्षांनी स्वाक्षरी केली आहे. या सनदेत १९७२ च्या बांगलादेश संविधानात मोठे बदल करण्याची मागणी आहे. 'जुलै सनदे'ची अंमलबजावणी झाल्यास बांगलादेशमध्ये राजकीय शक्तीचे लक्षणीय विभाजन होईल. 'जुलै सनदे'च्या मॉडेलवर आधारित निवडणुकांदरम्यान काळजीवाहू सरकार, निवडणूक आयोग आणि इतर संवैधानिक संस्थांची स्थापना केली जाईल. या प्रस्तावानुसार, संसद द्विसदनी असेल. वरिष्ठ सभागृहात शंभर जागा असतील. कोणत्याही संवैधानिक बदलांना अंतिम मान्यता मिळेल. विजयी पक्षांना 'जुलै सनदे'च्या ३० सहमती मुद्द्यांची अंमलबजावणी करावी लागेल. त्यात महिलांसाठी वाढलेले प्रतिनिधित्व, विरोधी उपसभापती, पंतप्रधानांच्या अधिकारावर मर्यादा, राष्ट्रपतींच्या अधिकारांमध्ये वाढ, मूलभूत अधिकारांचा विस्तार आणि न्यायपालिका आणि स्थानिक सरकारांचे स्वातंत्र्य बळकट करणे यांचा समावेश आहे.



ताज्या पावलांमुळे भावी पंतप्रधानांना शक्तिशाली होण्यापासून रोखण्यासाठी नियंत्रण आणि संतुलनाची एक नवी प्रणाली सुरू केली जाईल. सनदेतील इतर आश्वासनेदेखील अंमलात आणले जातील. युनूस यांनी जनमत चाचणीची घोषणा केल्यानंतर वाद वाढला आहे. आता चार वेगवेगळ्या सुधारणांवर जनतेचे मत विचारले जाईल. सुरुवातीला मानले जात होते, की चारही सुधारणांमध्ये प्रत्येकी 'हो' आणि 'नाही' असे वेगवेगळे पर्याय असतील. तथापि, आता हे स्पष्ट झाले आहे, की चार प्रश्न विचारले जातील; परंतु पर्याय तेच राहतील. याचा अर्थ असा की मतदार सर्व सुधारणांना 'हो' म्हणू शकतो किंवा नाकारू शकतो. बहुतेक लोकांना 'जुलै सनदे'बद्दल माहिती नाही. त्यांनी ते वाचलेलेही नाही किंवा त्यांना ते समजलेलेही नाही. एखादा शेतकरी किंवा रिक्षाचालक अचानक इतका मोठा राजकीय दस्तावेज वाचेल का? त्याचे स्पष्टीकरण कोण देईल? अनेक पक्षांनी आधीच म्हटले होते, की निवडणुकीपूर्वी जनमत चाचणी घेतली पाहिजे; परंतु युनूस प्रशासन दोन्ही एकाच वेळी घेत आहे. जनता पूर्णपणे गोंधळली आहे आणि प्रचार अद्याप सुरू झालेला नाही. जनमत चाचणीची तारीख जवळ आली तरी सनदेबद्दल जागरूकता शून्य आहे.

सध्या बंदी घातलेल्या हसीना यांच्या 'अवामी लीग'ने निवडणूक वेळापत्रक 'बेकायदेशीर, फॅसिस्ट आणि पक्षपाती' म्हणून नाकारले आहे. पक्षाचे म्हणणे आहे, की सरकार जाणूनबुजून त्यांना निवडणुकीतून वगळू पहात आहे. हसीना यांच्यावरील सर्व खोटे खटले रद्द करावेत, राजकीय कैद्यांना सोडावे आणि निष्पक्ष काळजीवाहू सरकारद्वारे निवडणुका घ्याव्यात, अशी मागणी पक्षाने केली आहे. 'अवामी लीग'चा मुख्य आरोप आहे, की युनूस सरकार हसीना यांना राजकीयदृष्ट्या पूर्णपणे संपवण्याचा कट रचत आहे; जेणेकरून जगाला हा संदेश मिळेल, की हसीना यांची जागा घेण्याचा निर्णय योग्य होता. हसीना यांच्या कार्यकाळात निवडून आलेले अध्यक्ष मोहम्मद शहाबुद्दीन यांनी म्हटले आहे की युनूस सरकारने त्यांना 'अपमानित' आणि 'बाजूला' केले. फेब्रुवारीच्या निवडणुकीनंतर ते राजीनामा देतील. 'जुलै सनद' मंजूर झाल्यास अध्यक्षपद अत्यंत शक्तिशाली होईल. त्यामुळे पंतप्रधान कळसुत्री बाहुले ठरतील. बांगलादेशमधील आगामी तेराव्या संसदीय निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी मतमोजणीही होईल. बांगलादेशमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी कोणत्याही पक्षाला किंवा युतीला १५१ जागांची आवश्यकता असेल. निवडणूक आयोगाच्या घोषणेनंतर हसीना यांचा पक्ष असलेल्या बंदी घातलेल्या 'अवामी लीग'ची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. युनूस यांनी यापूर्वी या पक्षाला निवडणूक लढवण्यापासून रोखण्याचा कट रचला होता; परंतु आता त्यातून काही प्रमाणात सूट दिली आहे.





'अवामी लीग'चे नेते अपक्ष म्हणून निवडणूक लढवू शकतात. पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवणे वेगळे आणि अपक्ष निवडणूक लढवणे वेगळे. त्यामुळे 'अवामी लीग' निवडणुकीच्या रिंगणात असण्याची शक्यता कमी आहे. हसीना यांच्या अनुपस्थितीतही बांगलादेशसाठी हा पक्ष महत्त्वाचा आहे. 'अवामी लीग'ला निवडणुका लढवण्यापासून रोखण्याच्या युनूस यांच्या निर्णयामुळे हे स्पष्ट झाले आहे, की सध्याचे सरकार पूर्णपणे पक्षपाती आहे आणि कोणताही निर्णय न्याय्य पद्धतीने घेऊ शकत नाही. 'अवामी लीग' बांगलादेशमधील सर्वात मोठ्या पक्षांपैकी एक आहे. त्याने १३ निवडणुकांमध्ये भाग घेतला आहे. त्यापैकी नऊ निवडणुका जिंकून सरकार स्थापन केले आहे. 'अवामी लीग' हा देशाच्या मुक्तीसंग्रामाचे नेतृत्व करणारा पक्ष आहे. हसीना यांचा पक्ष, इतर राजकीय पक्ष आणि देशातील बहुसंख्य लोकसंख्येला वगळून निवडणुका घेण्याचा प्रयत्न करणे हे देश आणि राष्ट्राला अधिक खोल संकटात ढकलण्याचे षडयंत्र आहे. त्यांना अजूनही चूक सुधारण्याची संधी आहे. सध्याचे संकट आणखी बिकट होऊ नये, म्हणून युनूस यांनी 'अवामी लीग'वर लादलेले सर्व निर्बंध उठवले, तरच या पक्षाला निवडणुकीच्या रिंगणात उतरता येईल; परंतु युनूस तसे करणार नाहीत. हसीना यांच्या काळात युनूस यांच्यावर झालेले आरोप आणि ठोठावण्यात आलेली शिक्षा ते विसरलेले नाहीत.

बांगलादेश अजूनही अस्थिरतेतून बाहेर पडण्यासाठी संघर्ष करत आहे. तेथे कोणताही सत्ताधारी पक्ष किंवा विरोधी पक्ष नाही. अशा परिस्थितीत निष्पक्ष निवडणुका शक्य होतील का आणि भारत–बांगलादेश संबंधांवर या बदलाचा काय परिणाम होईल. हे जाणून घेतले पाहिजे. दीड दशकाहून अधिक काळ सत्तेत राहिल्यानंतर हसीना यांना लष्करी उठावामुळे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या निदर्शनांमुळे पदच्युत करण्यात आले. बांगलादेशचे राजकारण आता स्वातंत्र्यानंतर कधीही न दिसलेल्या पातळीवर आहे. सध्या अंतरिम सरकार प्रभारी आहे. उठावानंतरच्या काही महिन्यांमध्ये युनूस यांच्या अंतरिम सरकारने निर्णय घेतला की देशातील सर्वात जुना आणि सर्वात मोठा पक्ष अवामी लीग निवडणुकीत भाग घेऊ शकणार नाही. पक्षाची नोंदणी रद्द करण्यात आली आणि त्यांच्या राजकीय कारवायांवर बंदी घालण्यात आली. आता बांगलादेशमध्ये सत्तेची पोकळी निर्माण झाली आहे. माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचा बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) हा पक्ष आणि 'जमात–ए–बांगलादेश' यांच्यात स्पर्धा होण्याची शक्यता आहे. दोन्ही पक्ष अनिश्चित स्थितीत असल्याचे दिसून येते. 'अवामी लीग'ला निवडणूक रिंगणाच्या बाहेर ठेवल्यानंतर बीएनपी पक्ष बांगलादेशी राजकारणातील सर्वात प्रमुख विरोधी पक्षांपैकी एक आहे. या पक्षाचे नेतृत्व तारिक रहमान करतात. ते सध्या लंडनमध्ये आहेत आणि तेथून पक्षाचे व्यवस्थापन करत आहेत. त्यांनी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादीही जाहीर केली; पण हे वरवरचे दावे आहेत. एके काळी मजबूत असलेला हा पक्ष अंतर्गत संघर्षांना तोंड देत आहे.

बीएनपी पक्षाच्या खालिदा आणि तारिक यांच्यासह शीर्ष नेते लंडनमध्ये आहेत. खरे तर जवळ जवळ सर्वांवर भ्रष्टाचाराचे आरोप होते. खटले आणि दबावामुळे ते लंडनला गेले आणि तेथून पक्षाचे नेतृत्व करत आहेत. ते स्वतः निवडणुकीत भाग घेऊ शकत नाहीत. त्यामुळे दूरवरून आदेश मिळवणे आणि विजय मिळवणे हे एक मोठे आव्हान असू शकते. 'जमात–ए–इस्लामी'ही रिंगणात आहे. हा एक धार्मिक राजकीय पक्ष आहे, ज्याचे काम शरिया कायद्याभोवती फिरते. ते इस्लामिक सामाजिक रचना निर्माण करण्यावर भर देतात. 'जमात–ए–इस्लामी' इस्लामी विचारसरणीवर चालत असल्याने देशात धार्मिक ध्रुवीकरण अपरिहार्य आहे. अल्पसंख्याकांविरुद्ध हिंसाचार आधीच होत आहे. हा पक्ष सत्तेत आला तर हिंदू आणखी एकाकी पडतील. परिस्थिती आणखी बिघडल्यास बांगलादेशची अवस्था तालिबानशासित अफगाणिस्तानसारखी होऊ शकते. दोन्ही देशांची सीमारेषा आहे आणि तेथे मोठ्या प्रमाणात हिंदू लोकसंख्या असल्याने भारताशी असलेल्या संबंधांवर परिणाम होईल. 'जमात–ए–इस्लामी'ने यापूर्वी भारत सरकारविरुद्ध विधाने केली आहेत. १९९० च्या दशकात हा पक्ष राजकारणात सक्रिय झाल्यापासून भारत बांगलादेशच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करत असल्याचा आरोप करत आहे. 'नॅशनल सिटीझन्स पार्टी' (एनसीपी) हा विद्यार्थ्यांचा पक्ष आहे. हा पक्ष थेट मुख्य प्रवाहातील राजकारणात प्रवेश करू शकतो. या पक्षाकडे उत्साह आहे; पण अनुभव नाही. शिवाय, तो वैचारिकदृष्ट्या 'जमात–ए–इस्लामी'च्या जवळचा आहे. त्यामुळे, भारत–बांगलादेश संबंध पुनर्संचयित होण्याची शक्यता दिसत नाही.

✦✦✦

**या वेळी नववर्षाचे स्वागत आरोग्यपूर्ण होणार आहे, कारण न्यू इयर सेलिब्रेशनसाठी खानपान आणि मद्य क्षेत्रातील ट्रेंड्स बदलत आहेत. आरोग्याला प्राधान्य देत, पार्टी मेनूमध्ये फायबरयुक्त, प्रोबायोटिक पदार्थांचा समावेश वाढत आहे. त्याचप्रमाणे, नॉन-अल्कोहोलिक पेये आणि मसालेदार फ्यूजन कॉकटेल मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होताना दिसणार आहे. यामुळे सध्याच्या उत्सवी वातावरणाला आरोग्यदायी आयाम मिळणार आहे.**

# उत्सवकाळाचे आरोग्यदायी सेलिब्रेशन!

वेध
**अश्विनी पारकर**

नववर्षाची पूर्वसंध्या अर्थात 'थर्टी फर्स्ट' ही जगभरात, विशेषतः भारतात मोठ्या उत्साहाने आणि आनंदात साजरी केली जाते. हा सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षाचे स्वागत करण्याचा क्षण असतो. २०२६ च्या स्वागतासाठी बाजारात आणि घरगुती पाट्यांमध्ये खानपान आणि मद्य क्षेत्रातील अनेक नवीन ट्रेंड्स लोकप्रिय होत आहेत, जे केवळ चवीवरच नाही, तर आरोग्यावरही भर देणारे आहेत. नव्या वर्षाच्या पार्टीची तयारी करताना पारंपरिक पदार्थांची जागा 'फ्यूजन', 'फंक्शनल' आणि 'इंक्लुसिव्ह' पदार्थांनी घेतली आहे. २०२६ मध्ये खाद्यसंस्कृतीत फायबर (तंतुमय पदार्थ), जागतिक चव (ग्लोबल फ्लेवर्स) आणि मनाचे आरोग्य या संकल्पना महत्वाच्या असणार आहेत. खानपान आणि मेजवान्यांमध्ये आता आरोग्यदायी पदार्थ उपलब्ध होत आहेत. आजघडीला खाद्यपदार्थांमध्ये 'आरोग्य' ही संकल्पना केवळ कॅलरी मोजण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर आतड्याचे आरोग्य आणि मानसिक संतुलनावर केंद्रित झाली आहे. २०२५ मध्ये 'प्रोटीन' ट्रेंडमध्ये होते, पण २०२६ मध्ये फायबर हा घटक सर्वाधिक महत्त्वाचा ठरत आहे. आतड्याचे आरोग्य सुधारण्यासाठी लोक उच्च फायबरयुक्त पेये आणि खाद्यपदार्थ निवडत आहेत. ओट्स, शेंगा, डाळी आणि विशेषतः विविध प्रकारचे दाणे यांचा वापर वाढला आहे. पार्टी स्नॅक्समध्येही भाजलेले चणे, फायबरयुक्त क्रॅकर्स आणि फ्रूट नट्सचे मिश्रण असलेले प्लॅटर्स लोकप्रिय होतील, असा आडाखा मांडला जात आहे. पारंपरिक इडली, डोसा, ढोकळा यांसारखे फर्मेंटेड पदार्थ तसेच पश्चिमी खाद्यसंस्कृतीतील कॅम्पुचा आणि किमचीसारखे पदार्थ आरोग्यदायी स्नॅक्स म्हणून पार्टी मेनूमध्ये समाविष्ट होत आहेत. दही आणि छास आधारित डिझर्ट्स आणि पेयांची मागणी वाढत आहे.

२०२६ मध्ये भारतीय स्वयंपाकघरात जागतिक खाद्यसंस्कृतीचा अधिक प्रभावी प्रवेश होणार असून त्यात स्थानिक चवीला महत्त्व दिले जाणार आहे. अनेक रेस्टॉरंटमधील पार्टी मेन्युमध्येही गोड आणि तिखट चवींचा संगम (स्वीट अँड स्पायसी) करणारा ट्रेंड मोठ्या प्रमाणात पसंत केला जाणार आहे. उदा. आईस्क्रीमवर चिली क्रिस्प, हॉट हनी पिझ्झा किंवा तिखट मसाल्याचे मिश्रण असलेली चॉकलेट्स. भारतीय पदार्थांमध्येही गोड-आंबट चटणीसोबत तिखट मसाल्याचा वापर करून नवीन स्नॅक्स जिभेचे चोचले पुरवण्याकामी अग्रस्थानी असतील. या वेळेच्या मेजवान्यांमध्ये केवळ चायनीज किंवा इटालियन खाद्यपदार्थांवर लक्ष केंद्रित न करता, आता रेस्टॉरंट्स आणि होम शेफ दक्षिण अमेरिकेतील पेरूचे सेविच, व्हेनेझुएलाचे एरेपा आणि पूर्व आशियातील कोरियन फ्राइड चिकन, मलेशियन लक्सा यासारख्या पदार्थांचा आस्वाद खवय्ये घेतील. पार्टी मेनूमध्ये मिनी-बाओ, कोरियन कॉर्न डॉग किंवा स्पायसी एडमामे या नव्या पदार्थांचा समावेश नवा अनुभव देईल. या वेळेची नववर्ष पुर्वसंध्या ही खाद्यपदार्थांमधील नवीन प्रयोगांची असेल. पारंपारिक भारतीय मसाल्यांव्यतिरिक्त आता हरिसा, गोचुजंग (कोरियन तिखट पेस्ट) आणि कॅलाब्रियन चिलीसारख्या आंतरराष्ट्रीय मसाल्यांचा उपयोग तंदुरी, टिक्का आणि कबाबमध्ये 'फ्यूजन' चव देण्यासाठी केला जाईल.






२०२६ मध्ये डेझर्ट्स हे केवळ गोड राहणार नसून खव्वयांच्या जिभेला काय अनुभव देतो याकडे शेफचे लक्ष असेल. एकाच डेझर्टमध्ये अनेक टेक्स्चर्स (उदा. कुरकुरीत, मऊ, क्रीमी आणि चवींचे थर असणे) हा नवा ट्रेंड आहे. उदा. क्रम्बल, मूस आणि जेलीचे थर असलेले पेस्ट्री. यंदा व्हायरल झालेले दुबई चॉकलेट आणि कोरियन क्रॉफल्स यासारखे पदार्थ नववर्षाच्या मेनूमध्ये डिमांडमध्ये असतील तर क्रीमची जागा फोम किंवा चीज क्रीमआधारित टॉपिंग्ज घेतील. वर म्हटल्याप्रमाणे आगामी वर्ष आरोग्याचे असेल. त्यामुळे 'गट हेल्थ'साठी फायदेशीर ठरणारी ड्रायफ्रुट्स, सीड्स आणि नैसर्गिक गोडवा वापरून बनवलेले पण तरीही अत्यंत चविष्ट असणारी डेझर्ट्स उदा. डेट आणि अंजीर सिरप वापरलेले केक लोकप्रिय होतील. मद्यपान आणि पेयांमध्येही नव्या संकल्पना रुंजी घालत आहेत. २०२६ मध्ये मद्यपान करताना मानसिक संतुलनावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे संतुलन, संवेदना आणि उद्देश्यपूर्णता या तीन संकल्पना दुरगामी ठरतील. सध्या 'झेब्रा स्ट्रिपिंग' ही संकल्पना लोकप्रिय होत आहे. या संकल्पनेत लोक अल्कोहोलिक आणि नॉन-अल्कोहोलिक पेयांचे सेवन आलटून-पालटून करतात. यामुळे पार्टीमध्येही नियंत्रण आणि संतुलन राखता येते. दारूचे प्रमाण कमी असलेले स्प्रीट्झर, हलकी बिअर आणि वाईन अधिक पसंत केली जाईल. तसेच अशा प्रकारची कॉकटेल्स जास्त प्रमाणात घेता येतात आणि त्यांचा प्रभावही कमी असतो.



नॉन-अल्कोहोलिक पेयांमध्ये आता फंक्शनल घटक उदा. डाप्टोजेन्स किंवा बोटॅनिकल्स वापरले जातात. ही पेये तणाव कमी करणे किंवा ऊर्जा वाढवण्यासारखे विशिष्ट फायदे देतात. यावेळी पाट्यांमध्ये चहालाही मागणी असेल. पारंपारिक चहा आता बबल टी, मॅच, आणि विदेशी फ्लेवर्सच्या कोल्ड ब्रू स्वरूपात मॉकटेलचा भाग बनत आहेत. चीज फोम टॉपिंग असलेले टी ड्रिंक्स लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. व्हिस्की, जिन किंवा रमच्या चवीचे, पण अल्कोहोल नसलेले झिरो अल्कोहोल स्पिरिट्स यापुढे पाट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसतील; ज्यामुळे मद्य सेवन न करणाऱ्यांनाही कॉकटेल्सचा अनुभव घेता येईल. २०२६ मध्ये कॉकटेलमध्ये जुनी फ्लेवर्स सोबत घेऊन नवीन फ्लेवर्सचा मेळ घातला जाईल. लिंबू, युझू आणि द्राक्षासारख्या फळांसोबत वॅनिला आणि चॉकलेटसारख्या समृद्ध चवींचा वापर (उदा. बर्बन, स्टॉउट) कॉकटेल्समध्ये अधिक केला जाईल. यंदाच्या पाट्यांमध्ये ९० च्या दशकातील लेमन ड्रॉप मार्टिनी आणि आइरिश क्रीम कॉकटेलचे पुनरागमन होईल. साध्या जिन किंवा व्होडकामध्ये आता चाय, इलायची, किंवा केसरसारखे भारतीय मसाले आणि चिली इन्फ्युज करून नवीन चवीचे स्पिरिट्स तयार केले जात आहेत. हे स्वदेशी स्पिरिट्स आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय होत आहेत. कॉफीआधारित कॉकटेल उदा. एक्स्प्रेसो मार्टिनी आणि ड्रिंक्समध्ये व्हिप्ड फोमचा वापर वाढला आहे. विविध फ्लेवर्सचे फोम (उदा. सॉल्टेड कारमेल, लॅव्हेंडर) ड्रिंक्सना नवीन संकल्पनेतील संवेदनात्मक अनुभव देऊ शकतात.

यापुढील काळामध्ये पाट्यांचे आयोजन-नियोजनही बदललेले असेल. मोठ्या गर्दीऐवजी आता जवळच्या मित्र-मैत्रिणींच्या आणि कुटुंबातील सदस्यांच्या छोट्या पार्टी आयोजित करण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. पार्टीमध्ये स्वतःचे कॉकटेल/मॉकटेल बनवण्याचे स्टेशन्स किंवा स्नॅक बार (उदा. गार्निश, फ्लेवर्स आणि टॉपिंग्ज) ठेवणे हा एक मोठा ट्रेंड आहे. यामुळे पाहुण्यांना आपल्या आवडीनुसार पेये किंवा स्नॅक्स तयार करण्याचा अनुभव मिळतो. २०२६ चे नववर्ष स्वागत केवळ उत्साह आणि जल्लोषाचा क्षण नसून, सकारात्मक आरोग्य, जागतिक चवींचा अनुभव आणि आनंद घेतानाही बाळगली जाणारी सजगता यांचा संगम असणार आहे. पार्टीसाठी पदार्थांची निवड करताना, केवळ काय खावे यापेक्षा ते कसे खावे आणि त्याचा शरीरावर काय परिणाम होईल, याकडे अधिक लक्ष दिले जाणार आहे. वस्तुतः ही काळाची गरज आहे. आज विशेष काळजी घेऊन आरोग्यवर्धक किंवा आरोग्याला पूरक खाणे पहायला मिळत नाही. लोक आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा संकल्प जरुर सोडतात, पण ती कायम राखत नाहीत. नवलाईचे चार दिवस संपले की पुन्हा सारे मूळ जागी येते. यामुळे बाजारात, समाजात असे पर्याय निर्माण होणे ही काळाची गरज आहेच, परंतु त्याबाबत समाजमन अधिक सजग होणे आणि अशा पर्यायांची ग्राहकवर्गानेही सतत मागणी करणे आवश्यक आहे.



✦✦✦

**अलिकडेच साजऱ्या झालेल्या शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू, कमलनाथ, मनीष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे सौगत रॉय, माजी केंद्रीय मंत्री डी. पुरंदेश्वरी आदी राजकारणी उपस्थित होते. मात्र त्याच वेळी त्यांच्या पक्षाच्या भवितव्याची आणि संभाव्य एकत्रिकरणाची चर्चा जोरात सुरु होती. नेमके काय घडतेय पडद्यामागे?**

# ब्रँड पवार आणि राष्ट्रवादीचे राजकारण

दृष्टीकोन
**डॉ. सुकृत खांडेकर**, ज्येष्ठ पत्रकार



माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांचा ८५ वा वाढदिवस बारा डिसेंबरला साजरा झाला. त्याच्या दोन दिवस अगोदर राजधानी नवी दिल्लीमध्ये त्यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या स्नेहभोजनाला विविध पक्षांचे दिग्गज नेते उपस्थित राहिले. सत्तेत असो किंवा नसो, सर्वपक्षीय राष्ट्रीय नेत्यांना एकत्र आणण्याची किमया केवळ शरद पवारांकडे आहे हे पुन्हा दिसून आले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी वड्रा, मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू, कमलनाथ, मनीष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे खासदार सौगत रॉय, माजी केंद्रीय मंत्री डी. पुरंदेश्वरी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रफुल पटेल, जयंत पाटील, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांची या सोहळ्याला उपस्थिती होतीच, पण देशातील मोठ्या उद्योगसमुहाचे सर्वेसर्वा गौतम अदानी हेसुध्दा शरद पवारांच्या शेजारीच बसून होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटरमधे आम जनतेसोबत त्यांचा वाढदिवस साजरा झाला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, रोहिणी खडसे, विद्या चव्हाण अशी टीम त्यांच्या बाजुला होती, पण सर्व थरातील आणि सर्व वयोगटातील सामान्य लोकांच्या झुंडीच्या झुंडी सकाळपासून त्यांना शुभेच्छा देण्यासाठी येत होत्या. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती. केंद्रात आणि राज्यात सत्तेच्या परिघात नसताना हजारोंची गर्दी तिथे लोटली होती. अडिच वर्षांपूर्वी अजित पवार हे चाळीस आमदारांसह पक्ष घेऊन भाजपासोबत गेले, सत्तेत सहभागी झाले. त्यांना भाजपने उपमुख्यमंत्रीपद दिले, आवडते अर्थमंत्रीपद त्यांना मिळाले. त्यांच्याबरोबर बंडात सामील झालेल्या दहा आमदारांना मंत्रीपदे मिळाली. सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्द्यावरून शरद पवारांनी बंड करून १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. राज्यातून डझनभर खासदार आणि पन्नास-साठ आमदार निवडून आणण्याची आपली ताकद आहे आणि आपल्याला बरोबर घेतल्याशिवाय सरकार स्थापन करता येणार नाही हे त्यांनी दाखवून दिले. शरद पवारांनी मोठे केलेले नेते, मंत्री अजितदादांबरोबर भाजपासोबत गेले आहेत. पण पक्षाचे कार्यकर्ते आणि शरद पवारांना मानणारी सर्वसामान्य जनता त्यांच्यावर आजही प्रेम करते, हेच त्यांच्या वाढदिवसाला जमलेल्या लोकांमुळे तसेच राष्ट्रीय राजकारणातील मुरब्बी मंडळींमुळे दिसून आले.

अजित पवार आणि त्यांनी बरोबर नेलेल्या पक्ष संघटनेला अजून तरी भाजपाचे संरक्षक कवच आहे. भाजपाच्या कवचामुळेच त्यांच्या पक्षाला राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक आणि राजकारणात वर्षानुवर्षे किंगमेकर म्हणून ओळखले जाणारे शरद पवार यांचे सत्तास्थापनेतील महत्व कमी करण्यात भाजपा यशस्वी झाली असेल, पण त्यांचे वलय कमी झालेले नाही. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकवला आणि चाळीस आमदारांसह भाजपासोबत गेले. उध्दव ठाकरेंप्रमाणे शरद पवारांनी अजितदादा आणि बंडखोर कंपनीला गद्दार ठरवले नाही. गेल्या अडिच वर्षांमध्ये शरद पवारांनी आपल्या पुतण्याविषयी कटु शब्द उच्चारले नाहीत आणि पुतण्यानेही त्यांचा अनादर केला नाही. वसंतदादा पाटील शुगर इंस्टिट्यूट, रयत शिक्षण संस्था अशा दिड-दोन डझन सार्वजनिक संस्थांवर काका पुतण्या पदाधिकारी आहेत. पण एकमेकांना कोणी पाण्यात बघितले नाही .

शरद पवारांसाठी बंड काही नवीन नाही. १९७८ मध्ये वसंतदादांचे सरकार पाडून पुलोद सरकार स्थापन केले, तेव्हा त्यांच्यावर दादांच्या पाठित खंजीर खुपल्याची टीका झाली होती. वयाच्या ३८ वर्षी राज्याचे सर्वात तरूण मुख्यमंत्री होण्याचा विक्रम त्यांनी केला होता. पण नंतरच्या काळात वसंतदादांचा अवमान होईल असे वक्तव्य त्यांनी केले नाही. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या विरोधात काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढवून त्यांनी पक्षात स्वतःचा दरारा निर्माण केला होता. रावांच्या विषयी मनात कधी अढी बाळगली नाही. सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्द्यावरून शरद पवारांनी काँग्रेसमध्ये बंडाचा झेंडा फडकवला पण नंतर डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारमध्ये ते दहा वर्षे केंद्रात कृषीमंत्री होते. यामुळेच अजित पवार यांनी केलेल्या बंडामुळे ते विचलीत झाले नाहीत. राजकारणात गेल्या साडेसहा दशकांहून अधिक काळ सक्रीय असलेल्या शरद पवारांची ओळख 'साहेब' अशी आहे. अनेक अडचणी, संकटे आणि आजारांवर त्यांनी मात केली आहे. त्यांचा पुणे, मुंबई, दिल्ली असा प्रवास अखंड चालू असतो, पण राज्यात चांद्यापासून बांद्यापर्यंत सर्वत्र सर्वाधिक फिरणारा नेता अशी त्यांची प्रतिमा आहे. तब्येत कशी आहे , असा प्रश्न पवारांना कधीच आवडत नाही. ते कधी थकलेले दिसत नाहीत. आजही वाचन भरपूर आहे. शेतीपासून कृत्रिम बुध्दीमत्तेपर्यंत अनेक विषयांमध्ये त्यांना रस आहे. लोकांची गर्दी हेच त्यांचे टॉनिक आहे.



भाजपाने २०२९ ची निवडणूक स्वबळावर लढवण्याची तयारी सुरु केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ही त्याची सुरूवात आहे. २०२९ च्या निवडणुकीत कुबड्या फेकून द्यायच्या असल्याचे स्पष्ट आदेश अमित शहा यांनी अलिकडेच दिले आहेत. राज्यात सत्तेवर येण्यासाठी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना बरोबर घेऊन ठाकरेंची शिवसेना आणि पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाचे खची केलीच. पण आता शत-प्रतिशत सत्ता प्राप्त करण्यासाठी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या कुबड्या दूर करायला सुरूवात केली आहे. एकनाथ शिंदे हे सारखे दिल्लीला धावतात आणि अमितभाईंना भेटतात. अमित शहा हे एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांचे राजकारणातील हायकमांड आहेत. अमित शहा हे भाजपाची ताकद कशी वाढेल याचा सदैव विचार करतात. शिंदे किंवा अजितदादांचा पक्ष मोठा करणे हे त्यांचे काम नाही. जे अमितभाईंच्या मनात आहे तेच महाराष्ट्रात देवाभाऊ व रवींद्र चव्हाण करत असतात. एकनाथ शिंदे हे माघारी फिरू शकत नाहीत. त्यांना भाजपासोबत राहूनच राजकारण करावे लागणार आहे, पण अजितदादांना काकांचा पर्याय आहे. काका - पुतण्यांनी तसे संबंधही ठेवले आहेत. भाजपा आपला विस्तार साधत असताना आपल्या पक्षाचा संकोच होणार हे अजितदादांना पूर्ण ठाऊक आहे. आपले अस्तित्व, आपला पक्ष आणि आपले सहकारी यांच्या भवितव्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊ शकतील का, अशा चर्चेला शरद पवारांच्या वाढदिवासाच्या निमित्ताने उधाण आलेले दिसले.



मुंबईमध्ये ठाकरे ब्रँड जवळ येणार असेल तर काका-पुतण्या का येणार नाही, असा प्रश्न विचारला जातो आहे. यावर काहीही होऊ शकते असे एक उत्तर आहे, सध्या तरी होकार किंवा नकार काहीच व्यक्त होताना दिसत नाही. महराष्ट्रामध्ये होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये मुंबई-ठाण्यात भाजपा आणि शिंदे सेनेची युती होणार, असे दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी जाहीर केले आहे. अन्य महापालिकांमध्ये तसेच जिल्हा परिषदांमध्येही असे होऊ शकते. मग अजितदादांचा पक्ष कुठे आहे, असा प्रश्न पडतो. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव कोणी घेत नाही. भाजपाने ठाणे व कोकणामध्ये शिंदेंच्या शिवसेनेला धक्का देण्याचे काम केले. उद्या अजितदादांच्या पक्षाबाबत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपा हाच प्रयोग करू शकतो, नव्हे तसे होणारच आहे. भाजपाच्या आक्रमक विस्तारवादापुढे एकनाथ शिंदे किंवा अजितदादा काहीच करू शकणार नाहीत. पक्षाच्या भविष्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र यावे अशी मानसिकता दोन्ही पक्षांमध्ये वाढते आहे. त्यातून काय आणि कसे निष्पन्न होते, ते आता पहायचे.

✦✦✦

साहित्य मैफल
महासागर
३
रविवार ■ दि. २१ डिसेंबर २०२५

# विदर्भाच्या जखमेवर मीठ.. जनतेची फसवणूक!

विदर्भाच्या वेदनेवर फुंकर घालण्यासाठी दरवर्षी एक परंपरा असते ती म्हणजे नागपूरचे हिवाळी अधिवेशन. हे अधिवेशन म्हणजे विधिमंडळाचे पर्व, आश्वासनांचा मेळावा, अन्यायाचा हिशेब, विकासाच्या नकाशावर विदर्भाला स्थान मिळवून देण्याची संधी. अशी जनतेची अपेक्षा.पण वास्तव काय? हा मेळावा आज विदर्भाचा नव्हे तर आमदारांचा अधिकाऱ्यांच्या बनून बसला आहे. हा उत्सव हक्काचा नव्हे तर सहलीचा बनला आहे. अधिवेशनच आज विदर्भाच्या जखमेवर मीठ चोळणारा विधिनाट्य ठरले आहे.

इथे लोकशाही नव्हे तर नोकरशाहीच .अधिवेशन की विंटर टुरिझम? जनतेला उत्तर देणार कोण? नागपूरमधील हिवाळी अधिवेशनाला जाणारे अनेक आमदार, अधिकारी, कर्मचारी हे अधिवेशनात उपस्थित असतात का? की अधिवेशनाच्या नावाखाली हिवाळी सहलीचा आनंद घेतात? हुरडा पार्ट्या करतात, हॉटेलमध्ये पार्ट्या करतात नाच गाण्याचे कार्यक्रम करतात हे आजचे चित्र उघड आहे :

३८३ खोल्या आमदारांच्या नावावर बुक प्रत्यक्षात फक्त ३५ आमदार उपस्थित, बाकी खोल्या? स्वीय सहायकांचा राजेशाही कब्जा! जनता विचारते हे अधिवेशन कोणासाठी? विधिमंडळासाठी की प्रायव्हेट टूर पॅकेजसाठी? जनतेच्या पैशाने सजवलेला आमदार निवास, नवीन फर्निचर, प्रकाशयोजना, रंगरंगोटी, सुसज्ज खोल्या... सर्व काही कोट्यवधींच्या खर्चातून. पण या खोल्यांत राहतं कोण?

विदर्भाच्या प्रश्नांना आवाज देणारे आमदार नव्हे, त्यांच्या वैयक्तिक सहायकांची जंत्री. चेले चपाटे. ही स्थिती म्हणजे जणू एखाद्या घरातले दिवाळीचे स्वच्छ केलेले खोलीच, ज्यात घरचे कोणीही राहत नाही, पण पाहुणे मात्र राजेसारखे वावरतात!

**विदर्भाला दिलेल्या शब्दाचे दफन**

नागपूर करार हा विदर्भासाठी न्याय, स्वायत्तता आणि विकासाची हमी. या करारानुसार नागपूरमध्ये अधिवेशन नियमित, अर्थपूर्ण, विस्तृत आणि निर्णयक्षम असणे आवश्यक आहे. पण आज तो करार होत आहे का? उत्तर नाही .

विदर्भाच्या प्रश्नांवर चर्चा तर नाहीच नाही आणि विधिमंडळ म्हणजे जनतेचा आवाज तो आवाज आज बंद सभागृहातील खुर्च्यांखाली हरवला आहे. स्टार हॉटेल संस्कृती सरकारी पैशावरचा राजेशाही उपभोग. विदर्भातील जनतेची परिस्थिती बघा. शेतकरी आत्महत्या, सिंचनाची कमतरता, बेरोजगारी, पायाभूत सुविधांचा अभाव, आरोग्य व्यवस्थेची दुरवस्था आणि दुसरीकडे अनेक आमदार व मंत्री अधिवेशन काळात फाईव्ह-स्टार हॉटेलमध्ये मुक्काम!

आता प्रश्न असा की, विदर्भातील दुःखाने त्यांचे मन हिवाळ्यासारखे थंड झाले आहे का? की अधिवेशनाच्या नावाखालील मौजच त्यांना जास्त महत्त्वाची झाली आहे? सरकारी पैशाची उधळपट्टी म्हणजे जणू जनतेच्या हातून भरलेले कराचे पैसे आणि त्याचा आनंद मात्र सत्ताधाऱ्यांना !हा अन्यायाचा थाट बघून विदर्भाचा आत्मा व्यथित होतो.

सभागृहातील शांतता विदर्भाच्या आवाजाची गळचेपी सभागृहात प्रश्न विचारायला हवे होते.पाणी प्रश्न, सिंचनाचे अभाव,औद्योगिक नियोजन, आरोग्य व्यवस्था, नागपूर-मुंबई समतोल, विदर्भाचे विधानभवन हक्क, बेरोजगारी, जंगल व आदिवासी हक्क, अकोला, अमरावती, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर यांच्या समस्या नागपूर कराराची अंमलबजावणी. परंतु सभागृहात शांतता. त्या शांततेत विदर्भाचे हक्क मरतात. तो आवाज दमत जातो आणि नेते बाहेर टीव्ही कॅमेऱ्यासाठी नाटक करतात. विरोधकही गप्प सत्ताधारीही गप्प आणि जनता मात्र आशेच्या उंबरठ्यावर उभी. विदर्भाच्या मुख्यमंत्र्यांच्याच काळात विदर्भाचा उपेक्षाभाव!

**हा मुद्दा सर्वात वेदनादायी**

विदर्भाचा मुख्यमंत्री असताना विदर्भातील अधिवेशन उपेक्षित राहणे विदर्भातील जनतेचा आवाज ऐकणे नाही, निवेदन घेणे नाही, निवेदनावर, मोर्चावर उत्तर नाही ही परिस्थिती मनाला चटका लावणारी. विदर्भाने इतिहासभर अनेक आशा धरल्या, अनेक संघर्ष केले.पण आज जे दिसते ते निराशेचं तांडव. विदर्भातील नागरिक विचारतातआमचे प्रश्न कोण मांडणार? आमची वेदना कोण जाणणार? आमचे हक्क कोण मिळवून देणार? सरकार, विरोधक, प्रशासन तिघांनीही जनतेला दाखवलेली उजळणीची पाठ.

या अधिवेशनाने तीन सत्ये उघड केली. सरकार उदासीन, विदर्भाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष, विरोधक कमजोर सभागृहात लढा नाही, रस्त्यावर नाट्य, प्रशासन निष्क्रिय, कोट्यवधींचा खर्च कुणासाठी हे सांगायलाही कोणी तयार नाही. ही तिन्ही शक्ती जनतेच्या विश्वासाचा भंग करतात.

हे अधिवेशन जनतेचा निर्णय बदलू शकते! अधिवेशनाच्या नावाखाली विदर्भाला मिळाले आश्वासने, फसवणूक, भुलथापा, सहलींचा खर्च,रिकामी वक्तव्ये, अव्यवस्था आणि शांतता

पण विदर्भाची जनता जागी झाली तर अधिवेशनाला पुन्हा अर्थ येऊ शकतो. नागपूर करार लागू होऊ शकतो. विदर्भाचे हक्क परत मिळू शकतात आणि नेत्यांना जबाबदार बनवता येऊ शकते जनता उठली की सत्तेला जाग यावीच लागते.अधिवेशन बदलेल ते जनतेच्या निधारामुळेच.

हिवाळी अधिवेशनाच्या नावाखाली विदर्भाला दिलेली जखम आणि आता उठण्याची वेळ नागपूरचे हिवाळी अधिवेशन हे आज विदर्भाच्या दारिद्र्यावरचे तिखट हसू आहे. जनतेच्या विश्वासावरचा आघात आहेआणि लोकशाहीतील ढोंगीपणाचे जिवंत चित्र.

विदर्भाने आपल्या हक्कासाठी लढा दिला आहे.पण आता या उपहासाविरुद्धही लढा देण्याची वेळ आली आहे वेदना आहे ती खरी राग आहे तो योग्य आणि प्रश्न आहे तो न्यायाचा. विदर्भाची जनता आता एकच गोष्ट मागते अधिवेशनाचे पर्यटन नको, विदर्भाचा विकास हवा! नागपूर कराराचा भंग नको, त्याची पूर्ण अंमलबजावणी हवी! नेत्यांची हिवाळी सहल नको, तर विदर्भाची हक्काची हिवाळी क्रांती हवी!

जर अधिवेशनाने विदर्भाचे ऐकणार नसेल तर विदर्भ नक्कीच अधिवेशनाला सुनावेल, आम्ही जागे आहोत, आम्ही सोडणार नाही! विदर्भावरील अन्याय सहन करणार नाही जनतेने या विरोधात सामूहिक आवाज उठवणे गरजेचे आहे. नाही तर दरवर्षीप्रमाणे नागपूर हिवाळी अधिवेशन होत राहील पण विदर्भाच्या हाती काहीच मिळणार नाही. ही परिस्थिती थांबवायची असेल तर जनतेचा रेटा आवश्यक आहे.



**नागपूरचे हिवाळी अधिवेशन**

नागपूरचे हिवाळी अधिवेशन विदर्भासाठीची यात्रा की यात्रेतील विदर्भ विदर्भासाठी? सर्वांत महत्त्वाची, सर्वाधिक अपेक्षांची आणि ऐतिहासिक वारशाची देणगी असलेले नागपूरचे हिवाळी अधिवेशन. या अधिवेशनाचा मूळ हेतू विदर्भातील प्रश्न ऐकणे, त्यावर चर्चा करणे, निर्णय घेणे, हा होता. परंतु आजचे वास्तव मात्र निराशा जनकच नव्हे तर लज्जास्पद आहे. कारण अधिवेशन हे आता जनतेच्या प्रश्नांचे व्यासपीठ न राहता, निव्वळ यात्रा, सहल, मुक्काम आणि ग्लॅमरचा मेळावा बनून बसले आहे.

**यात्रा की विधिमंडळ?**

नागपूरचे हिवाळी अधिवेशन म्हणजे सत्ताधारी व विरोधकांसाठी जणू एक विंटर फेस्टिव्हल.कोट्यवधींचा खर्च करून सुसज्ज करण्यात आलेले आमदार निवास, सरकारी व्यवस्थेने उभारलेला मंत्रिमंडळाचा तळ, हजारोंचा खर्च, लाखोंची सुविधा.परंतु या सुविधांचा लाभ कोण घेतो? विदर्भ? नाही! जनता? नाही! तर आमदारांचे वैयक्तिक सहायक! ३८३ खोल्या तयार त्यापैकी ३१३ खोल्या आमदारांच्या नावावर बुक, पण प्रत्यक्षात ३५ आमदारच उपस्थित! बाकी? स्वीय सहायकांचा राजेशाही ताबा.



गजानन कुसुम
ओंकार हरणे
जिल्हा परिषद नगर,
खडकी , अकोला.
9822942623

हे दृश्य पाहून एकच प्रश्न मनात येतो. हे अधिवेशन लोकशाहीचे की पॉश टुरिझमचे? नकली अधिवेशन, खरेच विदर्भाचे नुकसान. हिवाळी अधिवेशनाचा मूळ उद्देश शेतकरी प्रश्न, सिंचन, बेरोजगारी, आरोग्य सुविधा, उद्योग, नागपूर करार, वंचित विदर्भासाठीची निर्णायक पावले या सर्वांवर चर्चा व्हावी अशी अपेक्षा. परंतु सभागृहात शांतता, चर्चा नाही, ठोस मागण्या नाहीत, कामकाज क्षुल्लक आणि बाहेर मात्र कॅमेऱ्यासमोर बडबड, आरोप-प्रत्यारोप, पोझेस!

विदर्भातील जनतेचे प्रश्न एखाद्या जुन्या फाइलसारखे बाजूला सरकतात. आणि फाईव्ह स्टार हॉटेलमधील मौज मात्र सुरूच!

**नागपूर कराराचा उघड भंग**

नागपूर करारानुसार अधिवेशनात पुरेसा कालावधी विषयांचा सविस्तर विचार, विदर्भाशी संबंधित प्रकरणांवर प्रमुख चर्चा होणे बंधनकारक आहे. परंतु कराराचे पालन करण्याइतकी राजकीय इच्छाशक्ती कोणाकडे आहे? या प्रश्नाचे उत्तर आजही रिकाम्या सभागृहांमध्ये भटकताना दिसते.

हॉटेल संस्कृती आणि राजकीय विलासिता हिवाळी अधिवेशन म्हणजे विदर्भातील समस्या सोडवण्यासाठीची बैठक असा सामान्य नागरिकाचा समज. पण वास्तव काय?अनेक मंत्री, आमदार सरकारी बंगले, आमदार निवास सोडून खाजगी स्टार हॉटेलमध्ये मुक्काम करून राजेशाही थाट अनुभवतात. सरकारी खर्च? कोट्यवधींची उधळपट्टी!

जणू प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात एक मूक करार जनतेच्या पैशाने आमची सहल, जनतेचा प्रश्न मात्र रद्दी! सभागृहातील शांतता विदर्भाच्या आवाजाचे दफन. अनेक वर्षे चालत असलेली ही परंपरा की हिवाळी अधिवेशन म्हणजे गाजावाजा आणि काम मात्र शून्य. यंदाही विरोधकांचे प्रभावी प्रश्न नाहीत सत्ताधाऱ्यांची उत्तरे नाहीत.

सरकारी खात्यांची तयारी नाही आणि विदर्भासाठी एखादा निर्णय तर अजिबात नाही! सभागृहात जेव्हा चर्चा व्हायला हवी, तेव्हा शांतता पाहायला मिळते आणि कॅमेऱ्यासमोर मात्र नाट्यमय राजकारण!

हे अधिवेशन जर अशाच प्रकारे चालायचे असेल तर नागपूरचा इतिहास, नागपूर करार आणि विदर्भातील जनतेची आशा हे सर्व फक्त शब्दांमध्ये उरते. प्रशासनाचा कार्य कारणभाव कोट्यवधींचे उत्तर कोण देणार?

पीडब्लूडी विभागाच्या आकडेवारीतून हे स्पष्ट होते की कोट्यवधींचा खर्च ३१३ खोल्यांची बुकिंग प्रत्यक्षात फक्त ३५ आमदार स्वीय सहायकांचा कब्जा, सरकारी निधीचा बेजबाबदार वापर. अधिवेशन म्हणजे जबाबदारीचे, धोरणनिर्मितीचे स्थळ. पण ते खर्चाचे प्रदर्शन बनले तर ते आपत्तीजनक ठरते.

**विदर्भाच्या मुख्यमंत्र्यांच्या राज्यातही विदर्भा कडे दुर्लक्ष**

हे खेदजनक आहे की विदर्भातील मुख्यमंत्री असतानाही विदर्भातील अधिवेशनात विदर्भाच्या प्रश्नांवर ठोस पाऊल उचलले जात नाही! हे चित्र राजकीय इच्छाशक्तीचा पराभव आहे. जनता जागी झाली तरच अधिवेशन बदलेल.

नागपूरचे हिवाळी अधिवेशन विदर्भाच्या प्रश्नांसाठी आहे, परंतु विदर्भाच्या प्रश्नांना येथे ह्यप्रवेशह्च नाही! म्हणूनच आता जनतेने प्रश्न विचारले पाहिजेत आंदोलने, निवेदने, लोकशाहीच्या मार्गाने दबाव वाढवला पाहिजे अधिवेशनाला सहल बनवणाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे.

नागपूर कराराची अंमलबजावणी सक्तीने झाली पाहिजे. कारण विदर्भाच्या विकासाशिवाय महाराष्ट्राचा विकास पूर्ण होणार नाही आणि विदर्भासाठी आवाज उठवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. अधिवेशन बदलले पाहिजे, अन्यथा विदर्भ कधीच बदलणार नाही.हिवाळी अधिवेशन हा केवळ राजकीय कार्यक्रम नसून विदर्भाच्या हक्कांचा उत्सव आहे.

हा उत्सव आपणच अपयशी होऊ देत आहोत. सरकार, आमदार, मंत्री, विरोधक सगळे एकत्र येऊन विदर्भाकडे ढिम्म दुर्लक्ष करत असतील,तर आता जनता म्हणून आपणच हे अधिवेशन कोणासाठी? हा प्रश्न अधिक जोरात विचारला पाहिजे. विदर्भाच्या हक्कांच्या लढ्यात नागपूरचे हिवाळी अधिवेशन हे जागृतीचे व्यासपीठ बनावे हीच वेळेची गरज आहे.

# आपलेपणा, आपण आणि मी..

आपलेपणा याची सुरवात होते ती आपुलकी नावाच्या संवेदनेने! ही एकमेव अशी संवेदना आहे जी परमोच्च आनंद, सुख ते संताप, क्रोध आणि अपरिमित दुःख, या सर्व अनुभूति यांचे समायोजित स्वरूप दर्शविते.

आपण जर समस्त ब्रह्मांड दर्शना पासून सुरवात केली, आणि शास्त्रज्ञांच्या मदतीने खगोलीय दुर्बिणीच्या साह्याने सगळे तारका समूह, आकाशगंगांचे दर्शन करत बसलो, माहिती ऐकत बसलो, की थोड्या वेळाने आपल्या मनात विचार येऊ लागतात की हे सर्व जाउद्या, मला आधी आणि फक्त आपल्याच आकाशगंगेबद्दल ऐकायचे आहे. त्या बद्दलची दृश्ये आणि माहिती ऐकता ऐकता आपण फक्त आपली सूर्यमाला ह्यातच जास्त रस घेऊ लागतो.

त्यातल्यात्यात आपला चंद्र आणि आपली पृथ्वी. याबाबत आणखी खोलात जाऊ लागताच आपण केवळ आपल्या देशाचाच विचार करू लागतो; आणि यावर विस्तार पूर्वक विवेचन ऐकताना आपण मात्र आपल्या भाषिक प्रांतावर केन्द्रित होऊ लागतो.

अधिकाधिक खोलात जाताजाता आपण शेवटी आपले गाव/ शहर आपली कॉलनी आणि आपले घर.

यातून असे लक्षात येते की ही आपलेपणाची भावना संकोच होण्याचा गुणधर्म घेऊन आलेली आहे, तसेच ती वाढत वाढत विश्वरूप पण धारण करण्याची विशालता ही आपल्यात सामाऊन घेतलेली आहे. हे सगळे असे कसे होते? कशामुळे होते? विचारातच पडायला झाले. रात्रभर डोळ्याला डोळा लागला नाही.

पहाटे पहाटे एक वीज चमकली ! लक्षात आले की एकदम आयुष्याच्या सुरवातीलाच मनुष्य स्वतःलाच आपण समजू लागतो. आमच्या शेजारची चार महिन्याची चिमुकली देखील तेच समजते. जर तिच्या अवतीभोवतीचे लोक आपापसात गप्पा मारत असतील आणि तिच्याकडे काहीवेळ दुर्लक्ष्य झाले आहे असे जाणवले की ती पिल्ली टॅहँ टॅहँ करून लोकांचे लक्ष्य आपल्या कडे खेचते आणि लोकांनी तिला ओल्ले ओल्ले, काय हव बाळाला.. वगैरे बोलायला सुरवात केली रे केली की रडण थांबविते.

**स्वसंवाद (७)**



डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, नागपूर.
9370297441

त्यावर चिंतन करायला सुरवात केली आणि असे जाणविले की प्रत्येक व्यक्तीचे आयुष्यात अनेक वतुर्ळे त्या व्यक्तीचे आयुष्य घेरून ठेवतात. पहिले एक वर्तुळ असते. पहिल्या वर्तुळात ती व्यक्ति स्वतः असते own circle. दुसरे त्या बाहेरील वर्तुळ तिचे जैविक बंध असलेले circle of biological bonding असते. म्हणजे त्या व्यक्तीचे माता पिता, बंधु, भगिनी, तथा इतर रक्तसंबंधी नातेवाईक. थोडक्यात त्या व्यक्तीचे कुटुंब.

त्या बाहेरील तिसऱ्या वर्तुळात त्या व्यक्तीचे भावनिक संबंधित व्यक्ति ज्यांच्यावर त्या व्यक्तीचा प्रभाव काम करतो. त्याला इंग्रजी भाषेत आपण circle of influence म्हणू शकतो. जसे की जवळचे नातेवाईक, जीवश्चकंठश्च मित्रगण ,त्यानंतरचे वर्तुळ असते त्यालाच आंग्ल भाषेत आपण Circle of concerns म्हणू शकतो. ते म्हणजे अश्या व्यक्ति ज्यांच्याशी ती व्यक्ति काही न काही कारणांनी संबंधित असते. जसे शेजारी, व्यवसाय, सहकर्मी, स्वजातीय वगैरे वगैरे.

त्यानंतरचे सर्वात मोठे वर्तुळ म्हणजे भावनिक वर्तुळ किंवा Circle of emotions. ह्यात त्या व्यक्तीचे आधीच्या सर्व वतुर्ळांच्या आतील आणि त्या बरोबरच पुढील वतुर्ळात त्या व्यक्तीची सोसायटी किंवा आपल्या वैदर्भीयन भाषेतील वेटाळ, कॉलनी, पुढील वर्तुळात गाव/ शहर, नंतरील वर्तुळात प्रांत, त्या पुढील वर्तुळात देश, नंतरच्या थोड्या थोड्या फिक्के होत गेलेल्या वर्तुळात त्यानंतरचा खंड व उदाहरणार्थ आशिया खंड किंवा युरोप खंड.

पृथ्वी, सूर्यमाला, आकाशगंगा आणि विश्व ह्या भावनिक दृष्ट्या आपल्या मानल्या गेलेल्या गोष्टी येतात. आपण जर खगदृष्टीने पाहिले तर (birds' eye view') आपल्याला यात आपल्याला सात वर्तुळे दिसून येतात. यांनाच तर आपले पूर्वज सप्त लोक म्हणत नसतील ना? म्हणजे सप्तलोकी किर्ति पसरली इत्यादि इत्यादी वाक्प्रयोग यातूनच निर्माण झालेत की काय ?

**खगदृष्टीने दिसणारी सप्तवर्तुळे**

मानव यातील प्रत्येक वर्तुळातील सहभागी लोकांना, काल, स्थान, प्रसंग परत्वे आपण असे संबोधित असतो. जसे की कुटुंबातच बघाना, चुलत्यांशी संबंधित बाबीत आपण आणि ते होते. मित्रगण आपले असतात आणि व्यवहार संबंधित ते लोक असतात. जाती जातीत काही समारंभ असला तरी आपले आणि ते असतात.

लग्न प्रसंगी देखील मुला - मुली कडील मंडळी आपण आणि ते करतात, पण जर वाद कार्यालयाच्या व्यवस्थापनाशी झाला तर हे दोघेही आपण बनतात आणि कार्यालय वाले ते होतात. शहरांच्या बाबतीत देखील सर्व नागपूरकर किंवा पुणेकर अथवा मुंबईकर आपले बनतात आणि इतर शहरी ते होतात. पण महाराष्ट्र म्हटले की हे सगळे आपण होतात आणि गुजराती, बंगाली, पंजाबी, कन्नड, तामीळ सगळे ते म्हटले जातात. पण जेव्हा आतंकी हल्ला होतो त्यावेळी मात्र हे सगळे आपण होतात व पाकिस्तानी ते होतात.

ज्यावेळी गोरे- काळे वर्णभेद होतो तेव्हा पाकिस्तानी लोकांसह बांगलादेशी, भारतीय, सिंहली , अफघाणी सगळे आशियाई म्हणून आपण होतात. व अमेरिकन तथा युरोपिय ते होतात. तसेच जर कोठले एलियन वगैरे बातमी ऐकली की समस्त पृथ्वीवासी अशावेळी आपण होतात आणि एलियन्स यांना ते म्हटले जाते.

ह्या सगळ्या आपणचे मूळ म्हणजे मी आहे; आणि आहे एक हृदय ते हृदय समजणारी व समजली जाणारी भाषा रहीत प्रेम भावना. याचे कारण जन्मतः मनुष्याने स्वतः लाच बहुमानाने आपण संबोधले. म्हणूनच बोलताना माणूस, आपण कोणाचा गुलाम नाही! आपण या बाबतीत कोणाचे ऐकणार नाही. असली वाक्ये टाकत असतो. तेच हिन्दी सिनेमात अशुद्ध हिंदीत, ये अपून का इलाका है! असे टाळ्या घेणारे डायलोग्स ऐकत असतो. जुन्या काळातील राजे महाराजे देखील स्वतः ला बहुमानाने, आपण म्हणायचे.

एका महात्म्याला एका बादशाहाने हुकूम केला की तू मला सलाम केलाच पाहिजे. महात्मा म्हणाला, हे कोणी बोलले आहे? बादशहा म्हणाला माझ्या तोंडाने. महात्मा म्हणाला जर हा हुकूम मानला नाही तर काय होईल? बादशाहा म्हणाला तुझे शिर कलम करीन. महात्मा बोलला माझे शिर कोण कलम करील?

बादशाहा वदला माझा हात! महात्म्याने विचारले हे सर्व भाषण तू कशावर उभा राहून करतोयस ? बादशाह उद्गारला माझ्या पायावर! यावर महात्मा म्हणाला, म्हणजे हे बोलणारे तुझे तोंड आहे, मला मारणारे तुझे हात आहेत, आणि हे तू तुझ्या पायावर उभा राहून बोलतोस. म्हणजे हे सगळे तुझे आहेत, मग मी कोणाला सलाम करावा? तोंडाला? हाताला? की पायाला?

बादशहा म्हणाला, हे सर्व माझेच शरीर आहे . महात्मा म्हणाले, मान्य,पण शरीर तुझे आहे पण मुळात तू कोठे आहेस? की ज्याला मी सलाम करावा? बादशाहा अबोल झाला. त्यालाच आपल्या अध्यात्मात जीवात्मा म्हटले गेले आहे. हा जीवात्मा म्हणजे त्या परमात्म्याचा केवळ एक बिंदुयांश आहे. याच बिंदुला शरीर प्राप्त झाले की तो स्वतःला प्रसारण करत स्वकेंद्रित वर्तुळात रूपांतरित होतो.

या सप्त वतुर्ळांच्या पैकी कोणाही वर्तुळाला जर पीळ पडला तर त्या एकाचे दोन किंवा जास्त वतुर्ळांच्यात विभाजन होऊ शकते. आणि असले विभाजन करण्याचे काम एक तर त्या व्यक्तीचे वैरी करू शकतात किंवा राजकारणी मंडळी. जे की काल पर्यन्त आपल्या वर्तुळात होते .

त्यांना संपत्तीचा लोभ, भाऊबंदकी, जाती पाती, भाषा आणि अनेक विवादास्पद गोष्टींचा पीळ पाडून त्यांची एकी बेकी मध्ये विभागून टाकतात. माणसाने अश्यांच्या पासून नेहमी सावध राहावे. अन्यथा सुखाचे वर्तुळ नष्ट होऊन दुःखाचे वर्तुळात घेरले जाऊ शकते.

# जगण्याच्या पलीकडची अनुभूती!

मी, माझ्या मरीन ड्राईव्हच्या कार्यालयात कामात फार मग्न होतो. घड्याळाकडे पाहिले, तर रात्रीचे ११ वाजून गेले होते. काम आवरून मी बाहेर पडलो. नेहमीप्रमाणे मलबार हिलला गगनभाई यांच्या घरी मुक्कामाला जायचे, असे नियोजन केले होते. टॅक्सीच्या शोधात मी रस्त्याने पुढे निघालो.

थोडे पुढे गेल्यावर, रस्त्याच्या कडेला पोलिसांची एक गाडी थांबलेली दिसली. त्या गाडीतून एक पोलीस बाहेर आला आणि फुटपाथच्या कडेला बसलेल्या, भली मोठी पोत्यांची पट्टी घेऊन बसलेल्या माणसाजवळ गेला. ते त्या माणसाला म्हणाले, दे रे बाबा, तंबाखू.

तंबाखू चोळत पोलीस म्हणाला, अरे बाबा, तू अजून जिवंत आहेस? हे घरच्यांना सांगितलेस की नाही? समोरच्या व्यक्तीने चेहऱ्यावर चिंता आणत नाही, असे म्हणत मान हलवली.

जा रे बाबा घरी जा. अजून किती दिवस असाच ओळख लपवून राहशील? असे म्हणत, तो पोलीस गाडीत बसला आणि ती गाडी पुढे निघून गेली. मी त्या व्यक्तीजवळ आलो. तो काहीतरी दडपून जगतोय, हे जाणवत होते. बाजूला ठेवलेल्या पाण्याच्या बाटलीकडे बोट दाखवत मी त्याला विचारले, पाणी देता का प्यायला?

त्या व्यक्तीने क्षणाचा ही विलंब न लावता बाटली माझ्याजवळ आणून दिली. पाणी पिल्यावर मी त्याला म्हणालो, काका, त्या पोलिसांना बोलताना मी ऐकले. नेमकं काय प्रकरण आहे?

थोडासा गोंधळलेला तो माणूस म्हणाला, काही नाही, साहेब. ते माझ्या ओळखीचे आहेत, म्हणून सहज बोलत होते.

मी ज्या व्यक्तीशी बोलत होतो, त्या व्यक्तीचा पत्ता, तो किती दिवस तिथे आहे, त्याला किती पगार मिळतो याबद्दल माझे विचारणे झाले.

मी माझी बॅग त्या पोत्यांच्या पट्टीवर ठेवून त्याच्याजवळ बसलो. एक ते दीड तास झाल्यानंतर त्या व्यक्तीने त्याचे मागचे आयुष्य सांगितले, ते भयानकच होते. सगळे विसरून आता तो व्यक्ती मुंबईमध्ये आनंदाने दिवस काढतोय, पण तरीही त्याच्या मनावर काळजीचा मोठा ताण आहे, हे स्पष्ट दिसत होते.

मी ज्या व्यक्तीशी बोलत होतो, त्यांचे नाव विनोदकुमार मिश्रा. मिश्रा हे बिहारमधील वैशाली या प्राचीन शहरात राहायचे. त्यांनी सायकल रिक्षा चालवून तीन मुलं आणि दोन मुली शिकवल्या, त्यांची लग्नं लावली आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभं केलं. वय वर्ष साठ होऊन गेले तरी मिश्रा यांचे रिक्षा चालवण्याचे काम सुरूच होते.

एका दिवशी मिश्रा यांच्या रिक्षाला शाळेच्या बसचा अपघात झाला आणि त्यांचा रिक्षा मोठ्या नाल्यात पडला. मिश्रांना बाहेर काढतानाही त्यांच्या दोन्ही पायांना मोठ्या प्रमाणावर दुखापत झाली. यानंतर घरात मुलं आणि सुना यांच्यात वडिलांचे जबाबदारीवरून सतत भांडणं सुरू झाली. शेवटी, भांडणं टोकाला गेल्यामुळे मुलांनी वेगवेगळं राहण्याचा निर्णय घेतला. आयुष्यभर ज्या मुलांसाठी कष्ट केले, त्यांचं हे वागणं मिश्रांना सहन होत नव्हतं.

अपघातानंतर मिश्रा घरीच पडून होते. हळूहळू त्यांची प्रकृती सुधारली. त्याच दरम्यान, कोरोनाचा कहर सुरू झाला. मिश्रा आणि त्यांची मुलगी कावेरी दोघेही सरकारी दवाखान्यात भरती झाले. त्याच काळात एकदम कडक लॉकडाऊन लागला. अनेक दिवस कुणाचा कुणाला पत्ता नव्हता. दवाखान्यात माणसं मेल्यावर मृतदेह घेऊन जाण्यासाठीही कुणी येत नव्हतं.

मिश्रा आणि त्यांची मुलगी कावेरी ज्या सरकारी दवाखान्यात भरती होते, तिथे अनेक माणसे मृत घोषित झाली होती. मिश्रा म्हणाले, जिल्हा रुग्णालयात सुमारे साडेचारशे माणसे होती. त्यातील बहुतांशी सर्वांनाच डॉक्टरांनी मृत घोषित केले. माझ्या घरच्यांना वाटले की, त्या सर्व मृतांमध्ये मी आणि माझी मुलगीही होतो.

एक दिवस असा आला की, एकही डॉक्टर दवाखान्यात येत नव्हता. सरकारी माणसे रिकाम्या वाहनांनी येत आणि तिथल्या मृतदेहांना उचलून नेत असत. माझी मुलगी कावेरी तीन दिवस एका कोपऱ्यात पडून होती. तिच्या निर्जीव शरीराजवळ जाण्याची मला हिंमत होत नव्हती.

पण शेवटी मी तिच्या पायांवर डोके ठेवून मोठ्याने रडू लागलो. रडून रडून किती रडणार? मृतदेह पाहून डोळे सुकून गेले होते, तर घाण वासाने नाकाची जळजळ होत होती. ज्यांच्यात जीव होता, तेही तिथले भीषण दृश्य पाहून आपला प्राण सोडत होते.

तिकडे जिकडे पाहावे तिकडे फक्त मृतदेहच. माझ्या मुलीच्या मृत्यूची बातमी घरच्यांना मिळाली, पण मी जिवंत आहे की नाही हे पाहण्यासाठी कुणीच आले नाही. शेवटी मी त्या दवाखान्यातून बाहेर पडलो. घरी आता कोणीच नव्हते. लहान मुलगी, जी मला कधीमधी दिसायची, तीही आता या जगात नव्हती. डोक्यात सतत आत्महत्येचे विचार येत होते. पण का मरायचे, याचे उत्तर सापडत नव्हते.

एका औषधाच्या मालवाहू वाहनाने मी



भ्रमंती लाईव्ह स्टोरी
संदीप काळे
sandip98868@gmail.com
9890098868

वैशाली शहराजवळील भगवानपूर या छोट्या शहरात पोहोचलो. माझी ओळख कुणालाही न सांगता, एका मंदिरात तीन महिने राहिलो. या काळात मी माझ्या मुलांचा शोध घेतला. ते कुठे आहेत आणि काय करतात, याची माहिती घेतली. जेव्हा मला त्यांच्या स्थितीबद्दल कळाले, तेव्हा मला खूप मोठा धक्का बसला.

माझी तिन्ही मुले पुन्हा एकत्र आली होती. वडिलांनी आयुष्यभर जे शिकवले होते, ते आपण विसरलो होतो, याची त्यांना जाणीव झाली होती. वडिलांच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी सर्व भावंडे पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. मिश्रांचे संपूर्ण कुटुंब एकत्र आला होते. ही बातमी ऐकताच, मिश्रा खूप भावूक झाले.

चला, आपण जिवंत असल्याचे मुलांना सांगून त्यांना सुखद धक्का द्यावा, या भावनेने मिश्रा आपल्या डोळ्यातले अश्रू पुसत होते. घरी जाण्यासाठी ते निघणार इतक्यात त्यांच्या मनात एक विचार आला. मी नाही, माझा त्रास नाही, म्हणून माझ्या मुलांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. जर मी पुन्हा घरी गेलो, तर ते पुन्हा विभक्त होतील, हा विचार त्यांना सतावत होता. दोन-तीन दिवस त्यांनी हा विचार मनात फिरवत ठेवला.

अखेर त्यांनी मुलांकडे न जाण्याचा निर्णय घेतला आणि मंदिरातच राहायचे ठरवले. तीन-चार दिवसांनी त्यांना त्यांच्या ओळखीचा एक माणूस दिसला. त्याला पाहून त्यांचा विचार अधिक ठाम झाला– जर मी इथे राहिलो, तर माझ्या जिवंत असल्याची बातमी कधी ना कधी मुलांना कळेल, आणि ते पुन्हा विभक्त होतील. या विचाराने त्यांनी त्या ठिकाणाहून निघण्याचा निर्णय घेतला आणि मुंबई गाठली.

माझ्याशी बोलताना मिश्रा यांचे डोळे कित्येक वेळा भरून येत होते. त्यांना त्यांच्या नातवाची आणि छोट्या मुलांची आठवण होत होती. मी मिश्रा यांना विचारले, तुम्ही या वयात मुंबईत काम कसे मिळवले?

मिश्रा म्हणाले, ह्काही नाही, साहेब. सुरुवातीचे तीन दिवस स्टेटस हॉटेलच्या बाहेर बसून भीक मागून खात होतो. आमच्या बिल्डिंगमधले वजीर साहेब म्हणाले, अरे, भीक मागून का खातोस? चल, तुला छान काम देतो. तेव्हापासून मी इथे कामाला आहे.

आमचे बोलणे सुरू असताना बाजूला झोपलेला एक व्यक्ती उठून म्हणाला, अहो आजोबा, जर कधी इथेच मेला तर तुमचे काय होईल? कोण करील तुमचे अंत्यसंस्कार? तुमच्या घरच्यांना कोण सांगेल?

तेव्हा मिश्रा अगदी शांतपणे म्हणाले, त्यांच्यासाठी तर मी केव्हाच मेलो आहे. साडेअकरा वाजेपर्यंत फुटपाथवर त्या मोठ्या पोत्यांच्या पट्टीवर आम्ही दोघेच होतो. मागच्या चार तासांत तिथे सहा जण झोपून गेले होते. कुणाला आमदार निवासात जागा मिळाली नव्हती, कुणाला हॉटेल परवडत नव्हते, तर कुणी सकाळच्या गाडीने जाणार होते. काही जण सकाळच्या ड्युटीवर जाणारे कामगार होते.

मिश्रा म्हणाले, ही गर्दी इथे रोजच असते. सुरुवातीच्या काळात मलाही मुंबईत रात्री झोपण्यासाठी खूप त्रास झाला. माझ्यासारखा हा त्रास इतरांना होऊ नये, म्हणून मी मालकाला विनंती केली होती की गरजू लोकांना थोडी मदत करु द्या.

मालक म्हणाले, करा, पण गेटच्या बाहेर करा. काय बंगला आणि काय फुटपाथ, सर्वांचे सारखेच असते.. वर आकाश आणि खाली जमीन. जमिनीवर झोपलो ना की, अहंकार नाहीसा होतो. मिश्रा यांचे हे बोलणे ऐकून मी म्हणालो, आज मीही इथेच झोपतो. पाहू, झोप लागते का!

मी बसलेला लांब झालो आणि मिश्रा मला म्हणत होते, नका, साहेब! इथे मच्छर आहेत. पण मी ऐकत नाही हे लक्षात आल्यावर ते धावत त्यांच्या रुममध्ये गेले. त्यांनी कपड्यांनी भरलेली एक पिशवी आणली आणि ती माझ्या डोक्याखाली ठेवली.

मी त्या क्षणी विचार करत होतो, काय माणसे असतात ना! फुटपाथवर झोपतात, पण त्यांचे मन मात्र आभाळाएवढे असते. असे विचार करता करता मला कधी झोप लागली ते कळालेच नाही.

सकाळी उठून पाहतो तर काय, मी एकटाच तिथे झोपलो होतो. बाजूला मिश्रा झाडांना पाणी टाकत होते. त्यांनी दूरूनच मला शुभ सकाळह्र म्हणत निरोप दिला आणि पुन्हा आपल्या कामात मग्न झाले.

मी माझ्या ऑफिसकडे निघालो. माझ्या मनात विचार येत होता–काही माणसे आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी किती संवेदनशील असतात!

ते आपले आयुष्य उसनवारी करून इतरांचा विचार करतात. आपला जन्म कुणाला काहीतरी देण्यासाठी झाला आहे, याची प्रचिती त्यांच्या वागण्यातूनच दिसते. बरोबर ना? तुमचेही तसे आहे का.?

-------------

(लेखक महासागर मीडिया ग्रुपचे मुख्य समूह संपादक आहेत)

# ओटीटीवरही मनोरंजनाची मैफल

केवळ चित्रपटगृहेच नव्हे, तर ओटीटी प्लॅटफॉर्मवरही लक्षवेधी वेब सिरीज प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. यामुळे घरबसल्या मनोरंजनाचा आनंद घेता येणार आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील धक-धक गर्ल माधुरी दीक्षित या थ्रिलर वेब सिरीजमधून एका अत्यंत वेगळ्या आणि डार्क शेडमधील भूमिकेत दिसणार आहे. एका सीरियल किलरच्या भूमिकेत माधुरीला पाहणे प्रेक्षकांसाठी एक नवीन अनुभव असेल. 'ला मांते' या फ्रेंच सिरीजवर आधारित ही सिरीज १९ डिसेंबर २०२५ रोजी जिओ हॉटस्टारवर प्रसारित होईल. तरुण प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय असलेल्या 'फोर मोअर शॉट्स प्लीज' या आंतरराष्ट्रीय एमी-नामांकित सिरीजचा चौथा सीझनही १९ डिसेंबर रोजी अमेझॉन प्राईम व्हिडिओवर येत आहे. सयानी गुप्ता, कीर्ती कुल्हारी, बानी जे आणि मानवी गागरू या चार मैत्रिणींच्या आयुष्याची आणि त्यांच्या घट्ट मैत्रीची ही कथा पुन्हा एकदा धमाल उडवून देण्यासाठी सज्ज आहे.





# 'धुरंधर'चा धुमाकूळ!

५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झालेल्या चित्रपटांच्या बॉक्स ऑफिस आकड्यांवरून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की ॲक्शन थ्रिलर 'धुरंधर'ने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. अभिनेता रणवीर सिंग आणि अक्षय खन्ना स्टारर या चित्रपटाने पहिल्या आठवड्यातच (सात दिवसांमध्ये) दोनशे कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून मोठी कमाई केली आणि दुसऱ्या वीकेंडमध्येही आपला दबदबा कायम ठेवला आहे. त्याच आठवड्यात प्रदर्शित झालेला 'किस किसको प्यार करूं २' आणि त्या आधीच्या आठवड्यातील 'तेरे इश्क में'सारख्या चित्रपटांना 'धुरंधर'रुपी वादळाचा मोठा फटका बसला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 'धुरंधर'ने प्रदर्शनाच्या पहिल्या दहा दिवसांमध्ये (५ डिसेंबर ते १४ डिसेंबरपर्यंत) भारतीय बॉक्स ऑफिसवर ३५१ कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली. या दमदार कामगिरीमुळे हा रणवीर सिंगच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा हिट चित्रपट ठरत आहे. सत्य घटनेवर आधारित ही कथा प्रेक्षकांना चांगलीच भावली आहे. या आठवड्यात रिलीज झालेला दुसरा मुख्य चित्रपट म्हणजे 'किस किसको प्यार करूं २'. कपिल शर्मासारखा विनोदी कलाकार मुख्य भूमिकेमध्ये असलेला हा चित्रपट धुरंधरच्या तोडीस तोड कमाई करू शकलेला नाही. त्याने पहिल्या वीकेंडमध्ये जेमतेम ६.५७ कोटींची कमाई केली. हा चित्रपट धुरंधरसमोर फारसा तग धरू शकलेला नाही. हॉलिवूडच्या 'फाइव्ह नाइट्स ॲट फ्रेडीज २' या हॉरर चित्रपटानेही भारतामध्ये पहिल्या आठ ते दहा दिवसांमध्ये चांगली कमाई केली असली तरी, धुरंधरपुढे तोही मागे पडल्याचे दिसते.

# 'चला, हवा येऊ द्या' पुन्हा ब्रेकवर



मराठी वाहिन्यांमधील सर्वाधिक लोकप्रिय आणि प्रेक्षकांना खळखळून हसवणारा 'चला, हवा येऊ द्या' कार्यक्रम पुन्हा एकदा ब्रेकवर जाण्याची शक्यता असल्याची जोरदार चर्चा सध्या मनोरंजनसृष्टीमध्ये सुरू आहे. डॉ. नीलेश साबळे आणि विनोदी अभिनेता भाऊ कदम यांच्या पुनरागमनामुळे शोला नवी उभारी मिळाली होती, परंतु केवळ पाच महिन्यांमध्येच हा कार्यक्रम प्रेक्षकांचा निरोप घेत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये 'चला, हवा येऊ द्या'ला अनेक ब्रेक घ्यावे लागले आहेत. या वर्षी, जुलै २०२५ मध्ये शोचे कर्तेधर्ते डॉ. नीलेश साबळे आणि भाऊ कदम पुन्हा एकदा झी मराठी वाहिनीवर परतल्यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. 'गप्पांची शाळा' या संकल्पनेतून शो पुन्हा सुरू झाला, मात्र आता हा कार्यक्रम डिसेंबर २०२५ मध्येच बंद होऊ घातला आहे. सुरुवातीला 'शो'ला चांगली लोकप्रियता मिळाली असली, तरी टीआरपी रेटिंग्जमध्ये अपेक्षित सातत्य राखण्यात हा शो कमी पडत असल्याची चर्चा आहे. तसेच वाहिनीला आता नवीन संकल्पना आणि शो घेऊन यायचे आहे. त्यामुळे 'चला, हवा येऊ द्या'ला तात्पुरता ब्रेक दिला जात असल्याचे बोलले जात आहे.

# वर्षाच्या शेवटी चित्रपटगृहात स्पर्धा

वर्षाचा शेवट जवळ येत आहे, तसतसे चित्रपटगृहात मनोरंजनाची मोठी स्पर्धा पहायला मिळत आहे. सध्या काही बहुप्रतिक्षित चित्रपट प्रदर्शित होणार असल्यामुळे प्रेक्षकांना सप्ताहअखेर मनोरंजनासाठी अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. विशेषतः हॉलिवूडचा प्रचंड लोकप्रिय चित्रपट 'अवतार'चा तिसरा भाग आणि बॉलिवूडचे विविध विषयांवरील चित्रपट प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी सज्ज झाले आहेत. दिग्दर्शक जेम्स कॅमेरॉन यांनी 'अवतार: फायर ॲंड ॲशेस', 'अवतार: द वे ऑफ वॉटर'च्या यशानंतर, पंडोरा ग्रहावरील जेक सुली आणि नेयतिरी यांच्या कुटुंबाची कहाणी आता तिसऱ्या भागात पुढे सरकणार आहे. जेक सुली (सॅम वर्थिंग्टन) आणि नेयतिरी (झो सॅल्डाना) यांच्या संघर्षाचे आणि साहसाचे पुढील पर्व पाहण्यासाठी जगभरातील प्रेक्षक उत्सुक आहेत. अत्यंत प्रगत व्हिज्युअल इफेक्ट्स आणि भव्य निर्मितीमुळे हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर मागील 'धुरंधर'सारख्या चित्रपटांना आव्हान देऊ शकतो, असा जाणकारांचा अंदाज आहे. हॉलिवूडच्या या भव्य चित्रपटासोबतच बॉलिवूडमध्येही विनोदी आणि रहस्यमय अशा दोन भिन्न जॉनरमधील चित्रपट चित्रपटगृहांमध्ये दाखल होत आहेत. ज्येष्ठ आणि बहुमुखी अभिनेते संजय मिश्रा आणि सौंदर्यवती महिमा चौधरी यांची प्रमुख भूमिका असलेला 'दुर्लभ प्रसाद की दुसरी शादी' हा एक रोमँटिक-कॉमेडी चित्रपट आहे. एका विधुर वडिलांसाठी त्यांचा मुलगा वधूचा शोध घेतो, पण कथानकात येणारे भावनिक आणि विनोदी ट्विस्ट हा चित्रपट आगळा ठरवतात. भारतीय कुटुंबातील नातेसंबंधावर आधारित या फॅमिली ड्रामामध्ये विनोद आणि भावनांचा सुंदर समन्वय साधलेला दिसतो. संजय मिश्रा यांच्या नैसर्गिक अभिनयामुळे हा चित्रपट कुटुंबासोबत पाहण्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो. रहस्य आणि गुन्हेगारी कथांच्या चाहत्यांसाठी 'रात अकेली है: द बन्सल मर्डर्स' हा चित्रपट सज्ज आहे. प्रसिद्ध अभिनेत्री राधिका आपटे आणि इला अरुण यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या क्राईम थ्रिलरमध्ये कानपूरमधील एका श्रीमंत बन्सल कुटुंबाच्या गूढ हत्याकांडाची कहाणी आहे. एका रात्री घडलेल्या या भयानक हत्याकांडात तपासणी अधिकारी दडलेले सत्ता, फसवणूक आणि जुनी रहस्ये उलगडतो. हा सस्पेन्सफुल चित्रपट नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर दाखल होत आहे.



# 'बिग बॉस मराठी ६' करणार दमदार एंट्री

मराठी टेलिव्हिजनवरील 'बिग बॉस मराठी'च्या नव्या पर्वाची चाहत्यांना उत्सुकता लागून राहिली आहे. हा शो ११ जानेवारीपासून सुरू होणार आहे. त्यामध्ये कोणते सेलिब्रिटी स्पर्धक म्हणून दिसणार, याबाबत अजूनही गोपनीयता पाळली जात आहे. बिग बॉसची वेळ रात्रीची असल्याने वाहिनी याच वेळेत प्रसारित होणाऱ्या मालिका बंद करण्याची किंवा त्यांची वेळ बदलण्याची शक्यता आहे. 'कलर्स मराठी वाहिनी' याबाबत लवकरच अधिकृत घोषणा करेल. दरम्यान, यावेळी बिग बॉस नव्या वेळेवर प्रसारित होईल. कारण सोशल मिडियावर 'बिग बॉस मराठी'च्या चाहत्यांनी तशी विनंती केली आहे.



# 'समथिंग लाइक ट्रूथ'ची घौडदौड

मराठी रंगभूमीवर सध्या अनेक नव्या-जुन्या नाटकांची चर्चा सुरू असली तरी, अभिनेत्री पर्ण पेठे हिने दिग्दर्शित केलेल्या 'समथिंग लाइक ट्रूथ' या नाटकाची राष्ट्रीय स्तरावर विशेष दखल घेतली जात आहे. ज्येष्ठ लेखिका शांता गोखले लिखित या नाटकाचे आतापर्यंत २५ हून अधिक प्रयोग झाले आहेत. पर्ण पेठेने या नाटकाच्या निमित्ताने दिग्दर्शिका म्हणून पदार्पण केले आहे. या वर्षअखेरीस आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीला होणाऱ्या केरळमधील आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सव, दिल्लीतील भारतीय रंग महोत्सव, मिनर्वा फेस्टिव्हल कोलकाता, बहुश्रुत सेरेन्डिपिटी फेस्टिव्हल गोवा, रंगाशंकरा फ`स्टिव्हल (बंगळुरू) या पाच नामांकित नाट्य महोत्सवांमध्ये या नाटकाची निवड झाली आहे. यासोबतच, हृषिकेश जोशी यांच्या 'बोलविता धनी' या नव्या नाटकासाठी अभिनेता क्षितिज दाते सज्ज झाला आहे. तसेच, महेश मांजरेकर आणि भरत जाधव हे शंकर-जयकिशन या नाटकातून पहिल्यांदाच रंगभूमीवर एकत्र दिसणार आहेत. यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे.



# दे दो ऑस्कर!... अक्षयच्या अभिनयावर स्मृती फिदा!



माजी केंद्रीय मंत्री आणि लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री स्मृती इराणी यांनी अभिनेता अक्षय खन्ना यांच्या अभिनयाचे तोंड भरून कौतुक केले आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'धुरंधर'मधील अक्षय खन्नाच्या भूमिकेमुळे स्मृती इराणी इतक्या प्रभावित झाल्या की, त्यांनी अक्षयला थेट ऑस्कर पुरस्कार देण्याची मागणीच करून टाकली. स्मृती इराणी यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडिओ पोस्ट केला, ज्यामध्ये अक्षय खन्ना 'धुरंधर'मधील एका दृश्यात गंभीर अभिनय करताना दिसत आहे. हा व्हिडिओ पोस्ट करताना स्मृती इराणी यांनी कॅप्शनमध्ये लिहिले की, अक्षय खन्नासाठी एक ऑस्कर द्या... आताच! त्यांच्या या पोस्टमुळे सोशल मीडियावर अक्षय खन्नाच्या अभिनयाची आणि चित्रपटाची चर्चा पुन्हा एकदा वाढली आहे. स्मृती इराणींनी केलेल्या या अनपेक्षित कौतुकामुळे चित्रपटसृष्टीत आणि चाहत्यांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.